RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR
5.85

ISSN 0976-0377

*UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : XIX, Vol. II**
**Year - X (Half Yearly)**
**(July 2018 To Dec. 2018)**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

**Price: ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. S.D. Sindkhedkar**
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Ambuja N. Malkhedkar**
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis IMPACT FACTOR 5.85 ISSN 0976-0377
Issue:XIX, Vol. II, July 2018 To Dec. 2018

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Customer Attitude, Prefrenceand Satisfaction towards Investment in Iciciprudential Life Insurance Co. Ltd | Deepak Kumar Gupta, Dr. Vinod Khapne | 1 |
| 2 | Evolution of Urban Co-Operative Banks in India and their Current Status | Jagdish S. Walawalkar Dr. Subhash D Pawar | 7 |
| 3 | Impact of GST on the Indian Economy | Dr. Arun C. Kharde | 15 |
| 4 | Rural Politics and Human Rights of Women's | Dr. Vilas Bharat Bansode | 24 |
| 5 | नरेंद्र कोहली का साहित्य एक अनुशिलन | रमा मनाडे | 29 |
| 6 | राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून "अन्न सुरक्षा" | महेशकुमार भगवानराव चौरे | 38 |
| 7 | चिरंतर विकास - एक भौगोलिक अभ्यास | डी. बी. सोनकांबळे | 42 |
| 8 | महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण : एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. अनिल दत्तू देशमुख | 48 |
| 9 | भारताच्या विकासाला येणारे अडथळे | विक्रम सोनाजी इनकर | 58 |
| 10 | भारतातील बिगर शासकीय संघटना आणि विकास | डॉ. जगदीश देशमुख | 63 |

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 5.85 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol.II, July 2018 To Dec. 2018 

# चिरंतर विकास - एक भौगोलिक अभ्यास

**डी. बी. सोनकांबळे**
भूगोल विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय(स्वायत्त),
लातूर, जि. लातूर

7 Research Paper - Geography

**प्रस्ताविक :**

दुसरे जागतिक महायुध्द संपल्यानंतर इंग्रजी साम्राज्यातून अनेक राष्टे स्वतंत्र झाली. आफ्रिका आणि आशिया खंडातील बहुसंख्य देश दारिद्रय, कुपोषण, बेरोजगारी, निरीक्षरता, लोकसंख्या वाढ, यासारख्या विविध गंभीर समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करु लागले. गुलामीच्या जोखडातून मुक्त झालेल्या या राष्ट्रांना विकासाचे वेध लागले होते. उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीमधून विकास साध्य करावयाचा प्रयत्न ही राष्ट्रे करु लागली. त्यातून विकास या संकल्पनेचा उदय झाला परंतु भौतिक विकासाच्या नावाखाली आपण नैसर्गिक साधन संपत्तीचा पूर्णतः सर्वनाश करतो आहोत याची जाणीवच या काळात विकासाच्या मागे लागलेल्या अनेक देशांनी विसरली. केवळ भौतिक विकासाच्या अट्टाहासापोटी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक पर्यावरणातील अनेक घटकांचा अतिरेकी वापर करुन ही अनमोल नैसर्गिक साधनसंपत्ती संपुष्टात येत आहे. त्यामुळे येणाऱ्या पिढींचे भवितव्य धोक्यात येत आहे म्हणून येणाऱ्या पिढीसाठीसुध्दा या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करुन ठेवणे त्योच संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. हे ओळखून चिरंतर किंवा शाश्वत विकास ही संकल्पना पुढे आली आहे. जर आपण आताच ही सर्व नैसर्गिक साधने संपवली तर आपण भविष्यात कशाचा आधार घेऊन किंवा कोणती नैसर्गिक साधने वापरुन विकासाची प्रक्रिया सुरु ठेवणार आहोत हा यक्षप्रश्न आहे. कारण मानव कितीही प्रगत झाला त्याने कितीही नवनवीन शेध लावले तरी तो नैसर्गिक संसाधने निर्माण करु शकत नाही ही त्याची मर्यादा आहे. म्हणून उपलब्ध असणारी नैसर्गिक साधनसंपदा जनत करुन ठेवणे आणि त्यास पर्याय उपलब्ध करणे हे शाश्वत

विकास किंवा चिरंतर विकास या संकल्पनेमध्ये अभिप्रेत आहे.

विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनाचा अतिरेकी, अमर्याद वापर आणि त्यातुन साधला जाणारा विकास यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जगातील अनेक राष्ट्रांनी आर्थिक विकास साध्य करण्यासाठी त्यांच्या देशातील उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अमाप, अविवेकी वापर करुन अक्षरशः पर्यावरणाची लूट केली आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. मात्र या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, पर्यावरणाचा ऱ्हास करुन विकासाची प्रक्रिया सुरु ठेवणे हे आत्मघातकी आणि अल्पकालीन आहे. नैसर्गिक साधनंसपत्तीचा वापर अमर्याद होत राहिल्यास येणाऱ्या पिढयांना ही मोल्यवान नैसर्गिक साधनसंपत्ती शिल्लक राहणार नाही. त्यामुळे येणाऱ्या भावी पिढया कशाचा वापर करुन विकासाची प्रक्रिया सुरु ठेवणार? विकासाची प्रक्रिया सुरु ठेवायची असले तर त्यासाठी काही साधने आवश्यक असतात ती जर उपलब्ध राहिली नाहीत तर विकासाची प्रक्रिया खुंटते म्हणून चिरंतर विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आवश्यक आहे याच विचारातून १९७० च्या दशकानंतर ही शाश्वत विकासाची संकल्पना पुढे आली आहे.

**शोधनिबंधाचे उद्दिष्टये :-**

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१) चिरंतर विकास संकल्पनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.

२) चिरंतर विकास म्हणजे काय हे स्पष्ट करणे.

३) नैसर्गिक साधनसंपत्ती आणि चिरंतर विकासाचा परस्पर संबंध स्पष्ट करणे.

४) चिरंतर विकासात राज्याची किंवा सरकारची भूमिका अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहितकृत्ये :**

१) चिरंतर विकास या संकल्पनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी व्यापक आहे.

२) नैसर्गिक साधनसंपत्ती आणि चिरंतर विकासाचा निकटचा परस्पर संबंध आहे.

३) चिरंतर विकासात सरकारची भूमिका महत्वाची असते परंतु सरकार यामध्ये अपयशी ठरले आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.समस्या का निर्माण झाली याचा शास्त्रीय पध्दतीने शोध घेणे हे या पध्दतीचे महत्वाचे वैशिष्टये असते. समस्यांच्या कारणांचा मुळात जाऊन शोध घेणे व त्याच्या निराकरणासाठी प्रयत्न करणे हे या पध्दतीमध्ये महत्वाचे मानले जाते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आराखडयाचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :**

कोणत्याही संशोधनामध्ये तथ्याला महत्वपूर्ण स्थान आसते. तथ्याशिवाय संशोधन प्रक्रिया पूर्ण होत नाही. तथ्य संकलनासाठी प्राथमिक आि दुय्यम साधनांचा किंवा तंत्राचा वापर केला जातो. प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. चिरंतर विकास या संकल्पनेला अनुसरून उपलब्ध असलेल्या संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, दैनिकामधील प्रासंगिक लेख तसेच विविध संकेतस्थळाचा उपयोग करुन तथ्य संकलन करण्यात आले आहेत.

**चिरंतर विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

चिरंतर किंवा शाश्वत विकास ही संकल्पना जरी आधुनिक काळात अधिक प्रमाणात चर्चेचा विषय झाली असली तरी ही संकल्पना आपणास प्राचीन असलेली दिसून येते. अनेक धर्मग्रंथामध्ये या संदर्भात उल्लेख सापडतात. पंरतु एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ही संकल्पना अधिक जोर धरु लागली. कारण औद्योगिकीकरणानंतर झपाटयाने कारखानदारी व्यवस्थेचा विकास होऊ लागला भौतिक विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसंपत्तीचा अमर्याद वापर सुरु झाला त्यामुळे अल्पावधीतच नैसर्गिक साधनसंपत्तीचे साठे नष्ट होऊ लागले. पर्यावरणाचे अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. संपूर्ण जगासमोर पर्यावरणाचा ऱ्हास हा प्रमुख प्रश्न किंवा आव्हान उभे राहिले त्यामुळे याबाबत सर्वत्र विचार होऊ लागला त्यातून संघटितपणे व्यापक पातळीवर जागतिक स्तरावर प्रयत्न होऊ लागले. यानिमित्ताने अनेक परिषदा, चर्चासत्रे होऊ लागले त्याचा परिणाम म्हणून ही संकल्पना विशेष करुन १९७० नतर अधिक विकसित झालेली दिसते आहे. संयुक्त राष्ट्रसंघद्दनेच्या वतीने सन १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे आयोजित केलेल्या संयुक्त राष्ट्राची मानव परिषद यामध्ये सर्वप्रथम पर्यावरण विकासाचा व त्यानिमित्ताने चिरंतर विकासाचा मुद्दा जागतिक स्तरावर चर्चेचा विषय झाला. त्यानंतर एका दशकाच्या अंतराने म्हणजे १९८३ मध्ये हार्लेस ब्रुटलँड यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग (world commission of Environment and Development) स्थापन करण्यात आला, त्यासच ब्रुटलँड आयोग असे म्हणतात. International union for conservation of nature या संस्थेने १९८० मध्ये प्रसिध्द केलेल्या World conservation strategy या अहवालाच्या प्रसिध्दी नंतर चिरंतर विकासाबाबत जागतिक पातळीवर विचार होऊ लागला.

चिरंतर विकास या संकल्पनेच्या विकासाबाबत १९९२ मध्ये पार पडलेली वसुंधरा परिषद महत्वाची आहे. ही परिषद ब्राझीलची राजधानी रिओ दि जानिरो शहरात पार पडली. या परिषदेमध्ये जगभरातील जवळपास १०० पेक्षा अधिक देश सहभागी झाले होते.या परिषदेचा प्रमुख विषय शाश्वत विकास किंवा चिरंतर विकास हाच होता. चिरंतर विकास या तत्वाची अंमलबजावणी करण्यासाठी एक शाश्वत विकास आयोग (Sustainable Deuelopment commission) स्थापन करण्याचा

महत्वपूर्ण निर्णय या परिषदेने घेतला. पर्यावरणाचे सर्वस्वी संरक्षण आणि सामाजिक व आर्थिक विकास या दोन बाबी चिरंतर विकासासाठी आवश्यक आहेत यावर या परिषदेमध्ये विशेष भर देण्यात आला होता.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या वारंवार होणज्या अधिवेशनात अनेकदा चिरंतर विकासाचा मुद्दा चर्चेत आणला गेला आहे. नंतरच्या काळात म्हणजेच २६ ऑगस्ट २००२ मध्ये जोहान्सबर्ग येथे संपन्न झालेल्या शिखर परिषदेमध्ये वसुंधरा परिषदेमध्ये ठरलेल्या मुद्दांचा ऊहापोह करण्यात आला त्याचा सविस्तर आढावा घेण्यता आला. त्यास चिरंतर विकासाचा जोहान्सबर्ग मसुदा असे म्हटले जाते. यामुळे चिरंतर विकासाची संकल्पना अधिक व्यापक, सर्वसमावेशक करण्यात आली. ज्यामध्ये सामाजिक, आर्थिक विकास साध्य करताना नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन कसे होईल याकडे अधिक लक्ष देण्यात येऊ लागले.

**चिरंतर विकास म्हणजे काय ?**

चिरंतर विकास ही एक व्यापक संकल्पना आहे. त्याचप्रमाणे ही संकल्पना बहुआयामी स्वरुपाची आहे कारण अनेक घटकांशी या संज्ञेचा संबंध असलेला दिसून येतो. चिरंतर विकास याचा साधा सरळ अर्थ असा की, विकासाची प्रक्रिया कधीही खंडीत न होणे म्हणजे चिरंतर विकास होय. ब्रुटलँड आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये अतिशय समर्पक शब्दांत व्याख्या केली आहे ती म्हणजे, भावी पिढयांच्या गरजांचा विचार करुन वर्तमान पिढीच्या गरजांची पुर्तता करणारा विकास म्हणजे चिरंतर किंवा शाश्वत विकास (Sustainable Development) होय. शाश्वत विकासाची संकल्पना प्रामुख्याने मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर दूरदृष्टीने, विवेकाने करण्याशी संबंधीत आहे.

चिरंतर विकास या संकल्पनेत हे अभिप्रेत आहे की, भावी मानवी पिढयांना नैसर्गिक साधनसंपत्तीपासून व पर्यायाने विकासासापासून वंचित राहावे लागू नये. तसेच पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन यावर सर्वानी भर द्यावा. नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने, मर्यादित न्याय आणि समतेवर आधारीत विकास करण्यावर सर्वांनी भर दिला पाहिजे. उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी प्रदुषण टाळणे गरजेचे आहे. म्हणून पर्यावरणाचे होणारे प्रदुषण टाळण्यासाठी आवश्यक असणारे सर्व प्रयत्न सामुहिकपणे करणे त्यासाठी जाणिव-जागृती करणे गरजेचे आहे. महत्वाचे म्हणजे शाश्वस विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुर्नवापर करण्यावर भर देण्यात आला आहे. या सर्व गोष्टीचा अंतर्भाव चिरंतर विकास या संकल्पनेत होतो. एका अर्थाने चिरंतर विकास म्हणजे अनंत काळापर्यंत सातत्यपूर्ण टिकणारा सर्वागीण विकास होय ज्यामध्ये पर्यावरणाच्या संरक्षणाला अधिक महत्व देण्यात आले आहे.

**चिरंतर विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्ती :**

परस्परसंबंध.

**विकासाची संकल्पना ही पूर्णतः**

निसर्गावर आधारलेली आहे. विकास प्रक्रिया अखंडितपणे सुरु राहण्यासाठी काही साधने आवश्यक असतात. त्याचा वापर करुन आपण विकासाची गती कायम ठेवत असतो.निसर्गातील अनेक साधनांचा आधार घेऊन आपणास विकास साध्य करावयाचा असतो. या अर्थाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा आणि विकास प्रक्रियेचा जवळचा परस्परसंबंध आहे. चिरंतर विकासाच्या अर्थानुसार जर आपणास नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करुन विकास साध्य करावयाचा असेल तर आपण त्याचा अतिरेकी वापर टाळला पाहिजे. कारण आपण नैसर्गिक साधनसंपत्ती निर्माण करु शकत नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा काटेकोरपणे, मर्यादित, विवेकी वापर करणे गरजेचे ठरते. नैसर्गिक साधनंसपत्तीचा पुर्नवापर करुन आपण विकासाची प्रक्रिया कायम गतीमान ठेवू शकतो. म्हणूनच चिरंतर विकासात पर्यावरणाच्या संरक्षणाबरोबर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या पुनर्वापरावर भर देण्यात आला आहे. मानवी समाज जोपर्यंत नैसर्गिक साधंनसंपत्तीचा मर्यादित, विवेकी, संयमित, काटेकोर वापर करत नाही तोपर्यंत आपणास चिरंतर विकास साध्य करता येणार नाही. चिरंतर विकास साध्य करणे हे कुणा एका व्यक्ती वा समूहाची जबाबदारी नाही तर ती सर्व मानवजातीची प्रथम जबाबदारी ठरते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जबाबदाऱ्या, कर्तव्य ओळखून वागले तर साहजिकच आपणास चिरंतर विकास साध्य करता येईल. नाही तर आपणास पर्यावरणाच्या अनेक संकटाना सामोरे जावे लागणार आहे. याची जाणिव ठेवून प्रत्येकाने नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, संरक्षण करणे हे आपले पहिले कर्तव्य आहे असे समजून जबाबदारीने वागले तर आपणास शाश्वत विकासाकडे वाटचाल करता येऊ शकेल, अन्यथा आपणास निसर्ग माफ करणार नाही.

**चिरंतर विकासात राज्य किंवा सरकारची भूमीका :-**

चिरंतर विकासाची संकल्पना अनेक घटकांशी संबंधीत आहे त्यापेकी एक महत्वाचा घटक म्हणजे राज्य किंवा सरकार होय. चिरंतर विकासात राज्याची भूमिका अतिशय महत्वाची आहे. कारण नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनियोग करुन कशाप्रकारे विकास साध्य करता येईल याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे काम राज्य किंवा सरकार या यंत्रणेकडे असते. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासठी राज्य आवश्यक गोष्टी करतच असते त्यासाठी अनेक कायदे करत असते. या सर्व गोष्टी राज्याने केल्यासुध्दा आहेत उदा. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ परंतु प्रश्न असा आहे की, त्याची अंमलबजावणी कशी करावयाची म्हणूनच या संदर्भात असे दिसते की, स्वतः राज्य किंवा सरकारमध्ये बसलेली मंडळीच निसर्गाचा एक प्रकारे ऱ्हास करत आहेत. अनेक निर्णय, कायदे धाब्यावर बसवून फक्त आपल्या आर्थिक हिताचा विचार करुन निसर्गाशी अमानवी व्यवहार

करत असल्याचे दिसत आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्याने नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन करणे आवश्यक मानले आहे.परंतु राज्य तशा अर्थाने कोणत्याही स्वरुपात नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन करताना दिसत नाही. उलट राज्यघटनेच्या कलम ५१ अ प्रमाणे जी नागरिकांची कर्तव्य सांगितली आहेत त्याप्रमाणे पर्यावरणाची जबाबदारी ही सर्वस्वी नागरीकांचीच आहे अशी भूमिका राज्य घेताना दिसते.

**निष्कर्ष आणि समारोप :**

अशा प्रकारे या शोधनिबंधामध्ये सुरुवातीला विषयाला अनुसरुन प्रस्तावना स्पष्ट करण्यात आली आहे,त्यानंतर चिरंतर विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली ज्यामध्ये ही संकल्पना कशा पध्दतीने आज सर्व स्तरावर महत्वाची ठरली आहे हे विशद केले आहे. त्यानंतर चिरंतर विकासाचा अर्थ स्पष्ट करुन चिरंतर विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा परस्पर संबंध थोडक्यात स्पष्ट केला आहे. त्याच बरोबर राज्य किंवा सरकार आणि चिरंतर विकास यामध्ये राज्याची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. वरील विश्लेषणाच्या आधारे या शोधनिबंधाची काही प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) चिरंतर विकासाची संकल्पना प्राचीन असून ही अत्यंत व्यापक आहे.

२) चिरंतर विकासात पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनास अधिक महत्व देण्यात आले आहे.

३) चिरंतर विकासासाठी जागतिक पातळीवर अनेक स्तरावरुन प्रयत्न होत आहेत ज्यामध्ये संयूक्त राष्ट्रसंघाची भूमिका महत्वाची असलेली दिसून येते.

४) भावी पिढयांच्या विकासासाठी वर्तमान पिढींने नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटेकोर, मर्यादित आणि विवेकाने वापर करणे चिरंतर विकासात अभिप्रेत आहे.

५) चिरंतर विकासात राज्याची भूमिका महत्वाचे असते परंतु राज्य याबाबत अपयशी ठरलेले दिसून येते.

## संदर्भ सूची :-

१) पेंडसे अरुणा, सहस्त्रबुध्दे उत्तरा (२००८) प्रथम प्रकाशन आंतरराष्ट्रीय संबंध शीत युध्दोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण.

२) सावंत प्रकाश (२०११) पर्यावरण शिक्षण, फडके, पब्लिकेशन, कोल्हापूर

३) वराट तु. मा. व इतर : पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन अर्थव प्रकाशन, पुणे.

४) देशमुख श्रीपाद : जलप्रदुषण, आशय प्रकाशन, पुणे.

५) कुलकर्णी किशोर, वेध पर्यावरणाचा, मोरया प्रकाशन, डोबिंवली